**निशाणी १६ वरील आदेश**

(पारीत दि. ०३.०२.२०२१)

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने भाडयाची थकीत रक्कम रूपये ७७००/- भरण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. सदरच्या अर्जात प्रतिवादीचे असे कथन केले आहे की, प्रतिवादीने डिसेंबर-२०१८ पर्यत दरमहा ७००/- रूपये प्रमाणे भाडयाची रक्कम व्याजासह न्यायालयात भरली आहे व जानेवारी-२०१९ ते नोव्हेबर-२०१९ पर्यत ११ महिझयाची दरमहा रूपये ७००/- प्रमाणे ७७००/- रूपये भाडयाची रक्कम भरावयाची आहे. करीता प्रतिवादीने सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. सदरचे अर्जास वादीने आपला जबाब दाखल केला असुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज हा चुकीचा असुन न्यायाच्या दृष्टीने योग्य नाही. घरभाडे रूपये ७००/- दरमहा ठरले होते हे वादीस मान्य नाही. ठरवुन दिलेल्या भाडयाबाबत वादीने दाव्यात योग्य ते कथन केले आहे. सुरूवातीस वाद मिळकतीचे भाडे रूपये ६००/- दरमहा असे ठरले होते व त्यामध्ये दरवर्षी रूपये १००/- ने वाढ होईल असेही ठरले होते. प्रतिवादीकडे दि. ०१.०४.२०१६ रोजी पासुनचे भाडे थकीत आहे. प्रतिवादीने सदरचा अर्ज केवळ तो भाडे भरण्यास तयार आहे हे दाखविण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी हा ठरवुन दिलेले भाडे व्याजासहीत देण्यास टाळाटाळ करीत आहे. करीता प्रतिवादीचा सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकले. कलम १५ (३) महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा, १९९९ प्रमाणे भाडेकरूला समन्स प्राप्त झाल्यापासुन ९० दिवसाचे आत १५ टक्के प्रतिवर्ष या दाराने भाडे जमा करण्याचा अधिकार आहे. प्रतिवादी कलम १५ (३) महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा, १९९९ प्रमाणे आपला अधिकार मिळवित आहे. दोन्ही पक्षामध्ये किती

भाडे ठरले होते हे पुराव्याअंती ठरविणे योग्य होईल. करीता कलम १५ (३) महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा, १९९९ चे अनुषंगाने प्रतिवादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो व प्रतिवादीला भाडयाची थकीत रक्कम रूपये ७७००/– भरण्यास परवानगी देण्यात येते.

Digitally signed by Nishant Dnyaneshwarrao Gole
Date: 2021.02.03 16:17:40 +0530

दि. ०३.०२.२०२१

(एन. डी. गोळे)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, धामणगाव रेल्वे